नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १८७ Issue - 187 | वार रविवार दि. २४ नोव्हेंबर २०२४ Blow- Sunday Date 24 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



**थोडक्यात...**



### झारखंडमध्ये एनडीएचा दारूण पराभव!, जेएमएम–काँग्रेसने मिळवला ६० जागांवर विजय

झारखंड : मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने अटक केल्यानंतर झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन बरेच चर्चेत आले होते. ते तुरुंगवासात होते तेव्हा त्यांच्या जागी चम्पाई सोरेन यांनी मुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळली. महाराष्ट्रात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालेलं असताना झारखंडमध्ये मात्र भाजपाचा दारुण पराभव झाला आहे. झारखंडचे जेएमएम पक्षाचे आजी माजी मुख्यमंत्री जिंकले असून या पक्षाला पुन्हा सत्ता स्थापन करण्याची संधी मिळाली आहे. सत्ता कायम ठेवण्याचा राज्याचा इतिहास जेएमएम पक्षाने मोडला आहे.

जेएमएम–काँग्रेस युतीने ६० जागांवर विजय मिळवला आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी येथे ४२ जागांची आवश्यकता आहे. तर, भाजपाच्या नेतृत्वाखालील छऊने २१ जागांवर विजय मिळवला आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जेएमएम–काँग्रेस–राष्ट्रीय जनता दल युतीने ४७ जागा जिंकल्या. जेएमएमने स्वबळावर ३० जागा जिंकल्या होत्या. तर, २०१४ मध्ये १९ जागा होत्या. भाजपला ८१ पैकी फक्त २५ जागा मिळवता आल्या होत्या.

झारखंड विधानसभा निवडणुकीत दुसऱ्या व शेवटच्या टप्प्यात ३८ जागांसाठी बुधवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६८ टक्के मतदान झाले. १२ जिल्ह्यांतील १४ हजार २१८ मतदान केंद्रांवर मतदान शांततेत झाले. राज्यात सत्तारूढ झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वाखालील 'इंडिया ' आघाडीचा सामना भाजपच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत मुख्य लढत झाली. दोन संस्थांचा अपवाद वगळता बहुसंख्य मतदानोत्तर चाचण्यांनी राज्यात सत्तांतर होईल असे भाकीत वर्तवले होते. परंतु, सत्तांतर झालेले नाही. प्रत्येक निवडणुकीत नवं सरकार स्थापन करण्याचा या राज्याचा इतिहास आहे. मात्र, या इतिहासाची पुनर्रावृत्ती यंदा झाली नाही. कारण, पुन्हा सोरेन यांच्या जेएमएम–काँग्रेस युतीने येथे सत्ता काबिज केली आहे.

मतदानोत्तर चाचण्यांची सरासरी पाहिली तर राज्यात भाजप ४५ जागा जिंकेल असा अंदाज वर्तवला होता. झारखंड मुक्ती मोर्चाला सत्ताविरोधी लाटेचा फटका बसेल असा या चाचण्यांचा अंदाज होता. राज्यातील प्रचारात भाजपाने मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना लक्ष्य केले होते. त्याचबरोबर घुसखोरीची समस्या केंद्रस्थानी ठेवत, प्रचारात हिंदुत्वाचा मुद्दा जोरदारपणे मांडला होता. झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य असलेले माजी मुख्यमंत्री चंपई सोरेन हे निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये दाखल झाले होते. राज्यातील आदिवासी समुदायाच्या लोकसंख्येत बदल झाल्याचा आरोप भाजपाने प्रचारात करत विरोधी इंडिया आघाडीपुढे आव्हान उभे केले होते. परंतु, भाजपाचे प्रयत्न येथे अपयशी ठरले.

# राज्यात महायुतीला पूर्ण बहुमत

## महाविकास आघाडीचा दारूण पराभव; ४९ जागांवर विजय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने गेल्या सहा महिन्यांपासून राज्याच्या राजकीय वर्तुळात वातावरण तापलं होतं. महाविकास आघाडी व महायुती यांच्यात थेट झालेल्या लढाईत कोण बाजी मारणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. मतदानोत्तर चाचण्यांनी अंदाज वर्तवला होता की राज्यात अटीतटीची स्पर्धा होईल. तर काही चाचण्यांमधून त्रिशंकू स्थितीचा अंदाज वर्तवला होता. तीन चाचण्यांनी मविआच्या बाजूने कल दर्शवला होता. मात्र, सर्व राजकीय विश्लेषक, मतदानोत्तर चाचण्या चुकीच्या ठरवत महायुतीने तब्बल २३५ हून अधिक जागा जिंकल्या आहेत. रात्री आठ वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार २८८ पैकी २३६ जागांवर महायुती आघाडीवर आहे. तर महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर आघाडी मिळाली आहे. महायुतीमध्ये भाजपाला १३७, शिवसेनेला (शिंदे) ५८, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला (अजित पवार) ४१ जागा मिळाल्या आहेत. तर, महाविकास आघाडीत शिवसेनेला (ठाकरे) २०, काँग्रेसला १५ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने १४ जागा जिंकल्या आहेत.

अशा प्रकारचा निकाल कोणालाही अपेक्षित नव्हता. भाजता नेत्यांनी देखील १६० ते १७५ जागा मिळतील असाच अंदाज व्यक्त केला होता. मात्र महायुतीला २३५ हून अधिक जागा मिळाल्याने भाजपा व महायुतीतील नेत्यांना देखील आश्चर्य वाटलं आहे. भाजपा नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील अशाच प्रकारचं वक्तव्य केलं आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रातील जनतेने, तसेच विदर्भासह नागपूरच्या जनतेने आम्हाला प्रचंड आशीर्वाद दिला आहे. तसेच जे लोक सांगत होते की विदर्भात आमचं पानिपत होईल, आमचं विदर्भात किंवा नागपुरात पानिपत होईल त्यांचंच विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात पानिपत झालं आहे. राज्याच्या जनतेने आम्हाला आशीर्वाद दिला आहे. त्यामुळे मी राज्याच्या जनतेसह नागपूर व विदर्भाच्या जनतेचे, माझ्या कर्मभूमीचे आभार मानतो.

दरम्यान, यावेळी त्यांना विचारण्यात आलं की भाजपाला १३७ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे आता भाजपाचा, नागपूरचा मुख्यमंत्री होणार का? यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमच्या तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून चर्चा करतील आणि मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतील. हा निकाल खरोखरंच अविश्वसनीय, अभूतपूर्व असा निकाल आहे. ईश्वर व जनता जेव्हा आपल्याला काहीतरी देते तेव्हा भरभरून देते. जनतेने आम्हाला छप्परफाड मतदान केलं आहे.

## महाराष्ट्रात विकासवादाचा, सुशासनाचा, खऱ्याखुऱ्या सामाजिक न्यायाचा विजय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीनं दणदणीत विजय मिळवला आहे. तब्बल २३० जागांवर महायुतीला यश मिळालं आहे. तर महाविकास आघाडीला अवघ्या ४६ जागांवर समाधान मानावं लागलं आहे. या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाजप कार्यकर्त्यांना संबोधित केलं. भाजपच्या दिल्लीतील मुख्यालयात महाराष्ट्रातील निवडणूक विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी मोदींनी महाराष्ट्रातील विजयाचं महत्त्व विशद केलं.

गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रात कुठल्याही पक्षाला किंवा निवडणूकपूर्व आघाडीला मिळालेला हा सर्वात मोठा विजय आहे. सलग तिसऱ्यांदा भाजपच्या नेतृत्वात आघाडीला बहुमत मिळालं आहे. सलग तिसऱ्यांदा भाजप महाराष्ट्रात सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपला सलग तिसऱ्यांदा बहुमत देणारं महाराष्ट्र हे देशातलं सहावं राज्य ठरलं आहे, असं मोदी म्हणाले. याआधी गोवा, गुजरात, छत्तीसगड,



### पीएम मोदींनी सांगितलं महायुतीच्या विजयाचं महत्त्व

हरियाणा मध्य प्रदेशनं भाजपला सलग तीनवेळा बहुमत दिलं आहे. महाराष्ट्रात विकासवादाचा, सुशासनाचा, खऱ्याखुऱ्या सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. महाराष्ट्रात खोटेपणाचा पराभव झाला आहे. विभाजनवादी शक्ती पराभूत झाल्या आहेत. घराणेशाही, नकारात्मक राजकारणाचा महाराष्ट्रात पराजय झाला आहे. एकट्या भाजपला महाविकास आघाडीपेक्षा जास्त जागा मिळाल्या आहे. तुष्टीकरणाचा सामना कसा करायचा ते शिवरायांच्या महाराष्ट्रानं दाखवून दिलं, असं मोदी म्हणाले. कार्यकर्त्यांशी संवाद साधताना मोदींनी एक है तो सेफ है, या घोषणेचा पुनरुच्चार केला. 'संविधानाच्या नावाखाली खोटं बोलून, आरक्षणाच्या नावाखाली एससी, एसटी, ओबीसींना लहान लहान गटांत विभागल्यास, त्यांच्यात फूट पाडल्यास आपल्याला यश मिळेल, असा विचार काँग्रेस आणि त्यांच्या इको सिस्टिमनं केला होता. पण काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांचा प्रयत्न महाराष्ट्रानं हाणून पाडला. महाराष्ट्रानं एक है तो सेफ है चा संदेश कृतीतून दिला,' अशा शब्दांत मोदींनी महाराष्ट्रातील मतदारांचं कौतुक केलं. संपर्ण देशात केवळ एक आणि एकच संविधान असेल आणि ते बाबासाहेबांच्या आंबेडकरांचं असेल, असा स्पष्ट संदेश महाराष्ट्रानं आज दिला आहे. जे कोणी समोर किंवा पडद्याआड देशात दोन संविधान आणण्याच्या गोष्टी करतील, तसा प्रयत्न करतील, देश त्यांना पूर्णपणे नाकारेल, हा स्पष्ट संदेश महाराष्ट्रातील जनतेनं दिला आहे, असं मोदी म्हणाले.

## वायनाड पोटनिवडणुकीत प्रियंका गांधींनी मोडला राहुल गांधींचा रेकॉर्ड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी आपल्या पहिल्या निवडणुकीत विक्रमी विजय मिळवला आहे. वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत त्यांनी चार लाखांहून अधिक मतांनी विजय मिळवत बंधू राहुल गांधींचा मताधिक्याचा विक्रम मोडला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी ३.६५ लाख मतांनी विजयी झाले होते. आता प्रियांका गांधी यांनी या आघाडीला मागे टाकत मोठी आघाडी मिळवलीय. वायनाड पोटनिवडणुकीत प्रियांका गांधी आणि त्यांचे प्रतिस्पर्धी यांच्यातील मतांचा फरक लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून निवडणूक लढवलेले राहुल गांधी आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा जास्त होता. दरम्यान याच पार्श्वभूमीवर आता राहुल गांधी यांनी ट्विट करत वायनाडमधील जनतेचे आभार मानले आहेत.

प्रियंका गांधी यांच्या विजयानंतर राहुल गांधी ट्विटमध्ये म्हणतात, वायनाडमधील माझ्या कुटुंबाने प्रियांकावर विश्वास ठेवल्यामुळे मला खूप अभिमान वाटतो. मला माहित आहे की ती धैर्य, करुणा आणि अतुल समर्पणाने आपल्या प्रिय वायनाडला प्रगती आणि समृद्धीच्या शिखरावर नेईल.


दरम्यान विजयानंतर प्रियांका गांधी यांनी वायनाडच्या जनतेचे आभार मानले आहेत. 'वायनाडच्या माझ्या प्रिय बंधू–भगिनींनो, तुम्ही माझ्यावर जो विश्वास ठेवला त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. काळाच्या ओघात हा विजय तुमचा विजय आहे, याची तुम्हाला जाणीव होईल आणि तुम्ही तुमचा प्रतिनिधी म्हणून निवडलेली व्यक्ती तुमच्या आशा–स्वप्ने समजून घेईल आणि तुमच्यासाठी लढेल, याची मी खात्री करून देते. संसदेत तुमचा आवाज होण्यासाठी मी उत्सुक आहे.'

## हा निकाल अनाकलनीय आहे, यामागंच गुपित शोधावं लागेल : उद्धव ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात महायुतीची लाट आली असून भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे),राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष सर्वाधिक जागांवर आघाडीवर आहेत. त्यामुळे त्यांना स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचं चित्र आहे. दरम्यान, या महायुतीच्या लाटेत महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला आहे. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांना मिळून ५५ जागांवर आघाडी घेता आली आहे. त्यामुळे या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधून मतदारांना उपरोधिक प्रश्न विचारला आहे. तसंच, भाजपावरही टीका केली आहे.

जणूकाही लाटेपेक्षा त्सुनामीच आली असल्याचं वातावरण दिसत आहे. सर्व सामान्य जनतेला पटलंय की नाही हा प्रश्न आहे. एकूण आकडे दिसत आहेत ते पाहिल्यावर सरकारला अधिवेशनात मंजुरीसाठी मांडण्याची गरजच नाही, असे आकडे आहेत. विरोधी पक्षच शिल्लक ठेवायचे नाहीत, असं त्यांनी ठरवलं आहे. भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा म्हणाले होते की फक्त एकच पक्ष राहील. त्यानुसार, देशाची वन नेशन वन पार्टी या दिशेने वाटचाल सुरू असल्याचं दिसतंय, असं उद्धव ठाकरे म्हणाले.



आम्ही ज्या प्रचारसभा घेतल्या, हा निकाल म्हणजे लोकांनी महायुतीला मते का दिली? सोयाबीनला भाव मिळत नाही म्हणून, महाराष्ट्रातील उद्योग राज्याबाहेर जात आहेत म्हणून, महिलांना सुरक्षितता नाहीय म्हणून दिली की नेमकी कोणत्या रागापोटी ही लाट उसळली आहे हे कळत नाहीय. हा निकाल अनाकलनीय आहे, यामागंच गुपित शोधावं लागेल. आपण निराश होऊ नका, खचून जाऊ नका, हा ईव्हीएमचा विजय आहे, असू शकतो. महाराष्ट्राच्या जनतेला निकाल मान्य नसेलतर आम्ही प्राणपणाने लढत राहू. महाराष्ट्रातील जनतेला आम्ही वचन देतो की आम्ही लढत राहू, असं आश्वासनही उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडीच्या मतदारांना दिलं.

ते पुढे म्हणाले की, लाडकी बहीण योजनेचा हा इम्पॅक्ट असेल तर बाकीच्या गोष्टी उघड उघड दिसत आहेत. लाडकी बहीणपेक्षा आमच्या सभेला प्रचंड गर्दी होत होती, घर कसं चालवायचं, कारण महागाई वाढतेय, असं विचारलं जातं होतं. मग वाढती महागाईची शाबासकी म्हणून मत दिलंय का? असा प्रश्न विचारताच ते पुढे म्हणाले, हा टोमणा नाही, पण अस्सल भाजपाचा मुख्यमंत्री होईल का? असाही प्रश्न त्यांनी भाजपाला विचारला आहे.

**काँग्रेस, भाजपा, प्रहारसह राष्ट्रवादीतील दिग्गजांचा पराभवात समावेश**

**मातब्बरांच्या पराभवाने राजकीय वर्तुळात बनला चर्चेला विषय**

## राज्यातील विधानसभा निवडणुकीत दिग्गज नेत्यांचा पराभव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल आज (२३ नोव्हेंबर) रोजी जाहीर झाला. विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं तर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. खरं तर ही विधानसभेची निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी अटीतटीची होईल असं अनेकांना वाटलं होतं. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत उलट निकाल लागला आणि महाविकास आघाडीला धक्का बसला. एवढंच नाही तर काँग्रेस पक्षाच्या दिग्गज नेत्यांचा पराभव झाल्यामुळे दिग्गजांना धक्का बसला आहे.

**बाळासाहेब थोरातांचा पराभव**

विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात (इरश्रीरहशल ढहींरीं) यांचा पराभव झाला आहे. संगमनेरमधून थोरात पराभूत झाले आहेत. ते आत्तापर्यंत त्यांनी आठवेळा निवडणूक लढवली होती आणि ते एकदाही हरले नव्हते. मात्र आता नवव्या वेळी त्यांचा पराभव झाला. काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जातो.

**पृथ्वीराज चव्हाणांचा पराभव**

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव झाला आहे. भाजपाचे डॉ. अतुलबाबा भोसले हे या मतदारसंघातून विजयी ठरले आहेत. महाविकास आघाडीची मोट बांधण्याकरता पृथ्वीराज चव्हाण आघाडीवर होते. तसंच, महाविकास आघाडीची सत्ता आल्यास पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होऊ शकतील, अशी शक्यताही बांधली जात होती. परंतु, त्यांचा दारुण पराभव झाला आहे.

**यशोमती ठाकूर यांचा पराभव**

काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचा तिवसा विधानसभा मतदारसंघात पराभव झाला आहे. त्यांच्या विरोधात भाजपाचे राजेश वानखडे विजयी झाले आहेत. खरं तर राज्यातील दिग्गज काँग्रेस नेत्यांचा पराभव झाल्यामुळे काँग्रेसला धक्यावर धक्के बसले आहेत.

**धीरज देखमुखांचा पराभव**

काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या लातूर ग्रामीणमधून धीरज देखमुख यांचा पराभव झाला आहे. धीरज देशमुख यांच्यासाठी अभिनेता रितेश देशमुख यांचा प्रचार केला होता. मात्र, तरीही धीरज देखमुख यांचा पराभव झाल्यामुळे मोठा धक्का बसला.

**काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांचा पराभव**

विधानसभा निवडणूक २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. यामध्ये कसबा पेठ मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाला आहे. त्यांच्या विरोधात भाजपाचे हेमंत रासने यांचा विजय झाला आहे.

**प्रहारचे बच्चू कडू यांचा पराभव**

आमदार बच्चू कडू यांचा अचलपूर विधानसभा मतदारसंघातून पराभव झाला आहे. त्यामुळे बच्चू कडू यांना मोठा धक्का बसला आहे. बच्चू कडू यांच्या विरोधातील महायुतीचे उमेदवार प्रविण तायडे विजयी झाले आहेत. बच्चू कडू यांनी परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून महायुती आणि महाविकास आघाडीला आव्हान दिलं होतं.

**संजयकाका पाटील यांचा पराभव**

तासगाव–कवठे–महांकाळ विधानसभा मतदारसंघात सांगलीचे माजी खासदार संजयकाका पाटील यांचा पराभव झाला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर माजी खासदार संजयकाका पाटील यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात प्रवेश केला होता. तसेच लोकसभेची निवडणूक त्यांनी भारतीय जनता पक्षाकडून लढवली होती. मात्र, त्यातही त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर आता विधानसभेच्या निवडणुकीतही संजयकाका पाटील यांचा पराभव झाला. या मतदारसंघात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे रोहित पाटील यांचा विजय झाला आहे.

**शशिकांत शिंदेंचा पराभव**

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे नेते शशिकांत शिंदे यांचा कोरेगाव मतदारसंघातून पराभव झाला आहे. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे महेश शिंदे हे विजयी झाले आहेत. महत्वाचं म्हणजे शशिकांत शिंदे यांनी सातारा लोकसभेची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीतही शशिकांत शिंदे यांना पराभवाला सामोरं जावं लागलं होतं.

**राम सातपुतेंचा पराभव**

भारतीय जनता पक्षाचे आमदार राम सातपुते यांचा माळशिरस विधानसभा मतदारसंघामधून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे उत्तमराव जानकर यांनी पराभव केला. त्यामुळे आमदार राम सातपुते यांना मोठा धक्का बसला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विकास कामांच्या जोरावर विजयी तालुक्यात २५०० कोटींचा निधी



# सचिन दादा कल्याणशेट्टीच

## सलग दुसऱ्यांदा ४९ हजार ५७२ मतांनी जननायक सचिन कल्याणशेट्टी विजयी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**अक्कलकोट/कमलाकर सोनकांबळे :**

लक्षवेधी ठरलेली महाराष्ट्र विधानसभा २०२४ निवडणुकीत अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा भाजप महायुतीचे उमेदवार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा ४९ हजार ५७२ मतांनी दणदणीत विजय झाला असून परत एकदा सचिन कल्याणशेट्टी अक्कलकोट तालुक्याचे 'जायंट किलर' ठरले आहेत. मागील निवडणुकीत माजी गृहराज्यमंत्री आणि एकूण चार टर्म आमदार असलेल्या काँग्रेसच्या सिद्धाराम म्हेत्रे यांचा ३६ हजार मतांच्या फरकाने पराभव करत रेकॉर्ड ब्रेक कला होता तर यावेळेस स्वतःचा रेकॉर्ड ब्रेक करत ४९ हजार ५७२ मतांनी विजय मिळवला.

काँग्रेसचे महाविकास आघाडीचे उमेदवार माजी मंत्री सिद्धराम म्हेत्रे यांचा पराभव झाला असून त्यांना ९८ हजार ५३३ मते मिळाली असून भाजपा महायुतीचे उमेदवार

### तालुक्यातून १ लाख ४८ हजार १०५ मते मिळाली

सचिन कल्याणशेट्टी यांना १ लाख ४८ हजार १०५ मते मिळाली आहेत. अक्कलकोट विधानसभेसाठी पोस्टलसह २ लाख ५५ हजार ८९५ मतदान झाले होते. इतर पक्षाचे उमेदवार रासपाचे सुनिल बंडगर यांना १३१२, चंचित संतोषकुमार इंगळे यांना १८०७, मनसेचे मल्लिनाथ पाटील यांना १२९३ मते व बसपाचे इकरार शेख यांना ६९४ मते, प्रहार जमीर शेख यांना ७९८ मते मिळाली, इतर अपक्ष पुजा पाटील १४९, प्रसाद बाबानगरे २४३, शिवनिगप्पा वंगे ४२२, सिद्धाराम कोळी २२८. ज्ञानोबा साळुंखे ३११ मते मिळाली तर नोटा ला ११०४ मर्ते मिळाली. ११८ मते बाद झाली तर १९ गते टेन्डरने नोंदविली गेली.

### मागासवर्गीय वस्तीचे विकास कामामुळे दादाच्या पाठीशी जनता

**अक्कलकोट विधानसभा मतदार संघात आमदार सचिन कल्याणशेट्टी हे मोठ्या प्रमाणात निधी देऊन सामाजिक विकास साधल्याने पारंपरिक जे मत काँग्रेस जात होते ते मते मोठ्या प्रमाणात दादाच्या पाठीशी राहिल्याने लीड मध्ये वाढ झाले राजकीय जाणकारांच्या मते सत्तर टकके मागासवर्गीय मते भाजपाला मिळाल्याचे सांगितले त्यासोबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले ) गटाचे ही यात मोठा योगदान असून तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी अनेक सभा गाजवले रिपाई चे महायुतीची आघाडी असल्याने रिपाईचे मते देखील पल्स झाले आहेत.**

१६. टेबलच्या माध्यमातून एकूण २५ फेरीत मतमोजणी झाली असून मतमोजणी साठी २०५ अधिकारी व कर्मचारी नेमणूक करण्यात आले होते. प्रत्येक फेरीत कल्याणशेट्टी यांनी आघाडी घेतली होती तर १२, २४ आणि २५ व्या फेरीत सिद्धराम मात्र यांना लिड मिळाल्ये होती पण सचिन कल्याणशेट्टी पहिल्या अकरा फेरी अखेर २७ हजार ६७३ मतांनी आघाडीवर होते त्यामुळे सिद्धराम महत्रे यांना विजयाचा जवळ ही जाता आले नाही, २३ व्या फेरी अखेर सचिन कल्याणशेद्री यांना ५०,६५४ मतांची आघाडी घेतली होती पण शेवटच्या दोन फेरी मध्ये सिद्धराम महेत्रे यांनी आघाडी घेतल्यामुळे सचिन कल्याणशेट्टी यांना ४९ हजार ५७२ मतांनी विजयी घोषित केले.

**महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून गे गेल्या २.५ वर्षात कल्याणकारी योजना व विकास कामाच्या जोरावर हा विजय झाला असून मी हे सर्व श्रेय अककारकोट तालुक्यातील जनतेला व भाजपा व मित्र पक्षाच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकारी यांना देतो यांचा मुळे हा विजय सुकर झाला असून तालुक्यातील सर्व जनतेचे मी आभार मानतो,**
**आ. – सचिन कल्याणशेट्टी**

अक्कलकोट विधानसभा निवडणूक विविध विषयावर गाजले सुरुवातीपासून कल्याणशेट्टी यांचे प्रचार यंत्रणा चांगल्या प्रकारे रबिवल्या मुळे कार्यकर्त्यांमध्ये विजयाची खात्री होते निकालाच्या आधीच विजयाचे बॅनर ठीक ठिकाणी अक्कलकोट मध्ये लागल्याचे दिसत होते

निवडणूक प्रचारामध्ये विरोधकांनी अनेक प्रकारे टीका टीपणी करून घेरण्याचे प्रयत्न केले मात्र सचिन कल्याण शेट्टी यांनी कोरोणा काळातील दोन अडीच वर्ष वगळता अवघ्या दोन वर्षांमध्ये केलेल्या कामाचे प्रश्न पत्रिका प्रत्येक गावात घेऊन जाऊन त्याठिकाणी केलेल्या विकास कामाचे माहिती सांगत होते त्याची गुणपत्रिका आज निकालातून दिसून आले

अक्कलकोट शहर, दुधनी , मैंदर्गी, या नगर परिषद सह तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू असल्याने जनता भाजपच्या बाजूने असल्याचे दिसून आले अक्कलकोट बसस्थानक , मालिकर्जून मंदिर , तीर्थ क्षेत्र विकास आराखडा मंजूर करून कामास सुरुवात केल्याने लोकांत समाधान होते तसेच अक्कलकोट तालुक्यातील गेल्या सत्तावीस वर्षापासून रखडलेले देगाव एक्स्प्रेस सिंचन योजनेस अधिवेशन मध्ये पाठपुरावा करून निधी खेचून आणून काम पूर्ण पाणी विधानसभेतील गावात पोचवल्याने शेतकरी खुश होते त्यासोबत लाडकी बहिण योजनेमुळे महिलांनी समाधानी होते यासोबत मुस्लिम, दलित , बंजारा समाजातील मोठ्या प्रमाणात होत असलेले विकास कामामुळे जनता सचिन कल्याण शेट्टी यांना पसंती दिल्याचे दिसून येते

**महायुतीचे घटक पक्ष यांच्या सर्वांनी मिळून प्रामाणिक काम केल्याने कुठलीच दगा फटका झालं नाही यात शिवसेना तालुकाध्यक्ष संजय देशमुख, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे, रीपाई तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यासह घटक पक्ष सोबत होते. यावेळी राष्ट्रीय समाज पक्ष व वंचित बहुजन आघाडी यांचे निवडणुकीत प्रभाव दिसून आले नाही.**



तडवळ भागात सिद्रामप्पा पाटील यांचे सानुभुती सभेचे काहीच प्रभाव पडले नाही

माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी अचानक सिद्धाराम म्हेत्रे यांनी पाठिंबा देऊन तडवळ भागात एक सभा घेऊन सिद्रामप्पा पाटील यांचे सभेत रडून सानुभुती घेण्याचे प्रयत्न केले त्याचा काहीच प्रभाव पडले नाही, या भागातील जनता हे विकास कामाकडे लक्ष वेधून सचिन दादा यांना अकरा हजार लीड दिले त्यामुळे सिद्रामप्पा पाटील यांचे टागा पलटी घोडा फरार झाल्याचे आज लोकात चर्चा चालू होते.





आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यासोबत जन्मजयराजे भोसले ( महाराज ), अमोल राजे भोसले , मधुकर सुरवसे




पुण्याचे उद्योगपती मधुकर सुरवसे यांनी आ. सचिन दादा कल्याणशेट्टी यांना शुभेच्छा देताना



आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यासमवेत मिलन कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी

## अक्कलकोट तालुक्यात विजयी जल्लोष



श्री सचिन दादा कल्याणशेट्टी अक्कलकोट मतदार संघात आमदार म्हणून दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल सर्व सन्माननीय यांच्या उपस्थितीमध्ये शुभेच्छा देत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे गणेश पुजारी धम्मपाल मैंदर्गीकर भीमा इंगळे राम सर्वगोड आदी मान्यवर उपस्थित होते



मधुकर सुरवसे, राजकुमार झिंगडे दादा मित्र परिवार



किरनळी येथील भाजपा कार्यकर्ते शंकर उणदे, शंकर गुमते,असलम मुल्ला



शाम बाबर मित्र परिवार



ब्यागेहळी येथील ग्रामस्थ सोबत निजपा गायकवाड




उडगी येथील धोडूराज बनसोडे मित्र परिवार





भाजपा टीम वागदरी युवा नेते बसवराज शेळके, सुनील सावंत, प्रदीप पाटील, यासह युवा कार्यकर्ते



अक्कलकोट भाजपा युवा मोर्चा



शिरवळ येथे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे व अप्पासाहेब बिराजदार



गोगांव येथील भाजपा कार्यकर्ते





प्रदीप जगताप मित्र परिवार

दैनिक
# यश सिद्धि न्यूज






## थोडक्यात...

### गोंधळे वस्तीतील दोन घरातून साहित्य चोरले

सोलापूर, (प्रतिनिधी) : विजापूर रोडवरील गोंधळे वस्ती येथील दोन घरातून साहित्यांचे चोरी केल्याचे घटना १९ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी सखुबाई शिवाजी भोसले (वय-५५-,रा.झोपडपट्टी नंबर १,गोंधळे वस्ती,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून शाकीर शेख व त्याचे दोन साथीदार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या घरात व त्यांच्या गल्लीत राहणारे समीर नवीलाल शेख (रा.५६,उत्कर्ष नगर) येथून दोघांच्या उघड्या घरात वरील संशयित आरोपी यांनी प्रवेश करून ५१ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले आहे. तपास पो.ह. शिर्के हे करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत एक जण जखमी

सोलापूर, (प्रतिनिधी) : दुचाकीच्या धडकेत एक जण जखमी होऊन मोबाईलचे किरकोळ नुकसान केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १५ नोव्हेंबर रोजी रात्री दत्तनगर येथे घडली. याप्रकरणी बृंधारख देविदास वडलाकोंडा (वय-३०,रा.दत्तनगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अक्षय विजय भागवत (वय-३६,रा. पद्मा नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या घरासमोरून त्यांचा पुतण्या फटाकडी उडवत असताना ती फटाकडी लागली की नाही ते पाहण्यासाठी रस्त्यावर गेले असता, त्यावेळी वरील संशयित आरोपी याने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक एमएच.२५.ए.एन.०३२६ हे दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून धडक देऊन फिर्यादी यांना जखमी करत त्यांच्या मोबाईलचे किरकोळ नुकसान केले आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पो.ह. कांबळे हे करीत आहेत.

### शांतीनगरातील घरात घुसून महिलांनी केली चोरी; बारा अज्ञात महिलांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : शांतीनगर रविवार पेठ येथील फिर्यादी बाळकृष्ण हणमंतु दुभाशी (वय-४५,रा.शांतीनगर रविवार पेठ) हे घरासमोरील कट्ट्यावर बसलेले असताना अज्ञात दहा ते बारा महिलांनी त्यांच्या घरात प्रवेश करून कपाटामध्ये ठेवलेले १ लाख ७ हजार ८०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची फिर्याद बाळकृष्ण दुभाशी यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दहा ते बारा अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २० नोव्हेंबर रोजी सकाळी शांतीनगर रविवार पेठ येथे घडली. तपास स.पो.नि. सोनवणे हे करीत आहेत.

# माढा मतदार संघाचा ३० वर्षाचा कारभारी बदलला : आ. अभिजीत पाटील

## अभिजित पाटलांच्या विजयाने माढा-पंढरपूरमध्ये कार्यकर्त्यांचा जल्लोष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा मतदारसंघाचे शरदचंद्रजी पवार पक्षाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. अभिजीत पाटील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यांनी हा माढा मतदारसंघ संपूर्ण पिंजून काढत प्रचार यंत्रणा अतिशय चिकित्सक पद्धतीने वापरून त्यांनी हा मतदार संघ व प्रचाराचा प्रत्येक होम टू होम प्रचार करणारत करण्यात आल्यामुळे विजय मिळविला आहे.



**माढा मतदारसंघातून २४ हजार ७३४ मोठ्या मताधिक्याने त्यांनी विजय संपादन केलेला आहे.**

त्यांनी माढा मतदारसंघांमध्ये काम करण्याची व्हिजन माझे कशा प्रकारचे आहे हे प्रत्येक गावामध्ये जाऊन त्यांनी प्रचार सभेमध्ये कामाची पद्धत मी निवडून आल्यानंतर माढा मतदारसंघांमध्ये कशा पद्धतीने काम करणार आहे व तेथील लोकप्रतिनिधीने काही काम केलेले असतील किंवा काही काम केलेले नसतील ते काम सर्व शैक्षणिक सुधारणा असू द्या आरोग्याच्या सुधारणा असू द्या अनेक एमआयडीसीचे प्रश्न असू द्या असे प्रत्येक प्रश्न त्यांनी मांडून माझे व्हिजन या माढा मतदारसंघात मी काम करायचे कशा पद्धतीची आहे हे त्यांनी प्रत्येक गाव खेड्यामध्ये जाऊन प्रत्येक भाषणात त्यांनी आपले कामाचे कौशल्य व ते व्हिजन त्यांनी मांडून माढा मतदारसंघांमध्ये अनेक प्रकारची कामे राहिलेल्या ते कामे पूर्ण करण्यासाठी मला निवडून द्या व ती कामे पूर्ण करून दाखवील अशा प्रकारची त्यांनी माढ्यामध्ये एमआयडीसी असू द्या शैक्षणिक संस्था असू द्या, आरोग्याचे दृष्टीने मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल असू द्या असे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी मला निवडून द्या अशा प्रकारचे त्यांनी प्रत्येक गावामध्ये जाऊन आश्वासन दिले होते ते आश्वासन मी आता पूर्ण करणार असल्याचे पत्रकारांना त्यांनी बोलताना संबोधित केले आहे

या विजयामध्ये माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील. भारत शिंदे, संजय बाबा कोकाटे, दीपक शिंदे गुरसाळे गावचे सरपंच, दिनकर दाजी चव्हाण विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची संचालक व सर्व संचालक मंडळ शेतकरी सभासद व सर्व सुज्ञ मतदारांनी माझा हा विजय त्यांच्यामुळे झाला असे त्यांनी संबोधित करताना सांगितले.

# आमदार सचिन कल्याणशेट्टी हे दुसऱ्यांदा विजयी संपादन केल्याबद्दल अन्नछत्र मंडळाच्या वतीने सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी : आमदार सचिन कल्याणशेट्टी हे दुसऱ्यांदा विजयी संपादन केल्याबद्दल श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, महेश हिंडोळे, मिलन कल्याणशेट्टी, सिध्दाराम बाके, मधुकर सुरवसे, सागर कल्याणशेट्टी, मनोज कल्याणशेट्टी, बाळा शिंदे, स्वीय सहायक धनंजय गाढवे, यांच्यासह न्यासाचे सचिव शामराव मोरे, मनोज निकम, सौरभ मोरे, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, अतिश पवार, पिंटू साठे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.




# आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांचा दणदणीत विजय

## माधवराव घाटगे ठरले किंग मेकर

टाकळीवाडी/प्रतिनिधी : शिरोळ तालुक्यात दुसऱ्यांदा राजेंद्र पाटील यड्रावकर यांची आमदार पदी भरघोस मताने निवड झाली. जनतेने पुन्हा एकदा यांच्यावर विश्वास ठेवून यांची आमदार पदी निवड केली.

४०८१६ मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला. यामध्ये किंगमेकर ठरले श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी चेअरमन माधवराव घाटगे व संजय पाटील यड्रावकर यांच्या पुढाकाराने आणखीन बळ मिळाले.

राजेंद्र पाटील यड्रावकर निवडून आल्याबद्दल जयसिंगपूर परिसरात कार्यकर्त्यांनी जल्लोष मोठ्या प्रमाणात साजरा केला.

# आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या निवडीने अक्कलकोट तालुक्यात विजयी जल्लोष







मौजे गोगांव येथील ग्रामस्थ सोबत मधुकर सुरवसे, प्रदीप जगताप, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे